आरोग्य कायालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. एच ओ/ ६४५८
दिनांक :-२८/०९/२०२५

-: कार्यालय परिपत्रक :-

विषय :-"स्वस्थ नारी सशक्त परिवार" अभियानादरम्यान आयोजित शिबिरास उपस्थित रहाणेबाबत.

मे.केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि.१७/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ या कालावधीमध्ये दररोज सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० या वेळेत पुणे महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालय, युपीएचसी,आयुष्मान आरोग्य मंदिर,हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे "स्वस्थ नारी,सशक्त परिवार" अभियान राबविणेत येत आहे.

सदर अभियानांतर्गत दि.०१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०:३० ते ४:०० या वेळेत पुणे महानगरपालिका मुख्य इमारत,शिवाजीनगर,दुसरा मजला येथे खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या शिबीरांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	शिबिराचा तपशील	वेळ
१.	"आरोग्यंम धनसंपदा" अंतर्गत फक्त महिलांसाठी शारिरीक व मानसिक आरोग्य विषयक जनजागृती व मार्गदर्शनपर व्याख्याने	सकाळी १०:३० ते १२:३०
२.	सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता रक्तदान शिबिर	सकाळी ११:०० ते ४:००
३.	महिलांची आरोग्य तपासणी (असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम,हिमोग्लोबिन तपासणी)	दुपारी १२:३० ते ४:००

तरी उपरोक्त शिबिरांकरिता पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारत व सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी दि.०१ ऑक्टोबर २०२५ रोजी उपरोक्त नमुद वेळेत पुणे महानगरपालिका मुख्य इमारत,दुसरा मजला,शिवाजीनगर,पुणे ०५ येथे उपस्थित रहाणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

(डॉ.कल्पना बळीवंत) २९/९/२५
उप आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :-
१.मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका
२.मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/ई/वि),पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीस्तव...

प्रत :-
१.मा.सर्व खातेप्रमुख/मा.उप आयुक्त/विभागप्रमुख,पुणे महानगरपालिका
यांजकडेस आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी...